# धान पिकावरील रोगांचे व्यवस्थापन

श्री. आर. डी. चव्हाण
कृषि विज्ञान केंद्र, गोंदिया

भात हे आपल्या देशातील तसेच महाराष्ट्रातील लोकांचे प्रमुख अन्न असून या पिकाची लागवड प्रामुख्याने खरीप हंगामात केली जाते. तसेच जिथे ओलिताची सोय आहे तिथे उन्हाळी हंगामात सुध्दा हे पीक घेतले जाते. खरीप हंगामात हवेतील आर्द्रता, अनियमित पाऊस या बाबी भात पिकावरील रोगास कारणीभूत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना रोगाविषयी माहिती व उपाय माहित असणे आवश्यक आहे.

**१) करपा व मानमोडी :** भात पिकावरील हा एक महत्वाचा रोग असून याच्या नियंत्रणासाठी रोग प्रतिबंधक जातीचा वापर करावा उदा. आर.पी. ४-१४, रत्ना, साकोली-६, आय.आर.-६४ इत्यादी जातींची लागवड करावी. रोपवाटीकेत किंवा लावणीनंतर १५ दिवसांनी पानावर करपा रोगाचे लक्षणे दिसताच कार्बेन्डाझिम १० ग्रॅम किंवा हिनोसान ६ मि.ली. किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम किंवा ट्रायकोझोल ७ ग्रॅम यापैकी कोणतेही एक बुरशीनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**२) कडाकरपा :** कडाकरपा या रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन ०.५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून लागवडीनंतर १० दिवसाच्या अंतराने २ ते ३ फवारण्या करणे आवश्यक आहे.

**३) आभासमय काजळी :** या रोगाच्या नियंत्रणासाठी ३ टक्के मिठाच्या द्रावणाची बीज प्रक्रिया करावी आणि बियाला थायरम ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे औषध चोळून पेरणी करावी. तसेच हलके रोगट बी जाळून टाकावेत व शेतामध्ये हा रोग आढळल्यास लोंब्या काढून जाळून नष्ट कराव्यात.

**४) राईस बंट :** या रोगाचा प्रादुर्भाव धान पिकवणाऱ्या क्षेत्रात दिवसें दिवस वाढत आहे. या रोगामुळे तांदळाचा रंग काळा होतो. हा काळा तांदळाचा भाग म्हणजे या रोगाचे टेलीओस्पोर बिजाणू होय. या रोगाचे बिजाणु बियाण्यात व जमिनीत ४ ते ५ वर्ष सुप्त अवस्थेत राहतात. या रोगाच्या नियंत्रणासाठी पीक फुलोऱ्यावर असतांना कार्बन्डाझिम किंवा प्रॉपीकोनोझॉल (टिल्ट) ०.०१ टक्के फवारणी करावी.

* * *